९) नवीन मंदीराचे बांधकाम करतेवेळी मंदीराचा गाभारा उंच असावा मंदीर बांधतानाच आपत्कालीन रस्त्याचेही नियोजन करावे.

१०) मौल्यवान गोष्टी वेळोवेळी लिलाव करुन रक्कम बँकेत ठेवावी.

धार्मिक ठिकाणी काय करू नये याबाबत

१) दानपेटया वेळोवेळी रिकाम्या कराव्यात मंदीरात रात्रीच्या वेळी दानपेटी मध्ये दिवसभरात जमा झालेली रक्कम ठेवण्यात येऊ नये.

२) देवी देवतांच्या अंगावर मौल्यवान दागदागीने ठेवू नये.

३) रात्री CCTV बंद करु नये.

ब) इमारत बांधतेवेळी सुरक्षेच्या दृष्टीकोणातून काय करावे.

१) इमारतीचे चारही बाजुला मोकळी जागा सोडावी, जेणे करुन काही घडना घडल्यास सुरक्षेच्या दृष्टीने हालचाली करता येतील.

२) नवीन बांधकाम करताना खिडकीचे लोखंडी ग्रील हे भिंतीत बसवावे.

३) नवीन बांधकाम करताना चांगल्या प्रतिचे साहित्य वापरावे.

४) मोठे कार्यालय / मॉल / इमारती यांचा प्रवेशद्वार व बाहेर जाण्याचा दरवाजा मोठा असावा.

५) नवीन इमारतीचे वॉल कंपाऊड उंच व त्यावर तारेचे कुंपण असावे.

६) धार्मिक स्थळाचे दरवाजे चांगल्याप्रतिचे असावे व दानपेट्या जमिनीमध्ये या फिट असाव्यात.

७) इमर्जन्सी / सिक्युरिटी अलार्म डे / नाईट मोड असणारा असवावा, तसेच त्यासंबंधी नजीकच्या पोलीस ठाण्यास स्वयंचलित कॉल होण्याची सुविधा असावी.

इमारत बांधतेवेळी सुरक्षेच्या दृष्टीकोणातून काय करू नये.

१) ईमारतीचे खिडक्या / दरवाजे स्क्रुने फिट केलेले नसावे.

२) हलक्या प्रतिचे साहित्य वापरु नये.

३) इमारतीला अनेक प्रवेशद्वार नसावेत.

तरी वर दिलेल्या सूचनांची अमंलबजावणी करण्याबाबत संबंधित सोसायटी, कार्यालये व धार्मिक स्थळे यांच्या आस्थापनाकडे पाठपुरावा करावा. त्याचप्रमाणे नियोजीत बांधकामाबददल नगरपालीका/महानगरपालीका, बिल्डर, वास्तुविशारद (Architect) यांना देखील सदरच्या सूचना द्याव्या. तसेच त्यांनी वरील बाबीची अमंलबजावणी करणेबाबत त्यांचेकडे पाठपुरावा करावा. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.२८/०२/२०१६ रोजी पर्यंत या कार्यालयास सादर करावा.

सदरच्या सूचना जिल्हयाच्या website वर ठेवाव्यात.

(स्वाक्षरी)
( प्रवीण दीक्षित )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति

---

जावक कमांक :– जिविशा / लोह / 2016 – 436 दि. 5/02/2016

उपरोक्त परिपत्रकामध्ये दिलेल्या सुचनांचे वाचन करून अंमलबजावणी करावी तसेच योग्य कारवाई करून माहिती या कार्यालयास सादर करावी.

(स्वाक्षरी) 5/2
(डी.बी. सरक)
पोलीस अधिक्षक, लोहमार्ग,
नागपूर यांचे करिता

प्रती,

सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी, लोहमार्ग नागपूर जिल्हा.

प्रत, :– उपविभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग नागपूर / जालना / मनमाड.